प्रेसनोट दि १७/०१/२०१७.

## पुणे शहरातील नागरीकांना जादा रकमेच्या परताव्याचे आमिष दाखवून कोटयावधी रुपयांचा गंडा घालणा-या दोन आरोपीस जेर बंद

---

कोंढवा पो. स्टे.येथे दिनांक १२/०७/२०१६ रोजी दाखल असलेल्या गु.र.नं. २८३/२०१६ भा.दं.वि.क. ४०६,४२०,३४ सह एम.पी.आय.डी.क.३व४ या गुन्हयातील आरोपी यांनी आपापसात संगनमत करून २५० ते ३०० साक्षीदार व फिर्यादी यांचे गुन्हयातील आरोपी नामे राजेश दिनकर कांबळे त्याची पत्नी सौ विद्या राजेश कांबळे रा. क्लाउड नाईन सोसायटी एन.आय.बी.एम रोड पुणे तसेच त्याचे सहकारी अमोल चंद्रकांत शहा,रा. ससाणेनगर, हडपसर व अजय माधव देसाई रा. कात्रज पुणे, यांनी इव्हॉल्व कन्सटन्सी या नावाने कोंढवा भागात कंपनी स्थापन करुन सदर कंपनीच्या व्यवहारात चांगला परतावा मिळेल असे अमिष दाखऊन फिर्यादी व साक्षीदारांना सदर कंपनीत गुंतवणुक करण्यास भाग पाडुन त्यांचा विश्वास संपादन करून सन २००९ ते सन २०१६ पर्यत त्यानी फिर्यादी व साक्षीदारांचे मिळुन एकुण रुपये ७,७४,७०,०००/- ची फसवणुक केलेली आहे. आतापावेतो एकूण १०,४५,५०,५००/- रुपयांची फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

नमुद गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी नामे अजय माधव प्रभुदेसाई व अमोल चंद्रकात शहा यांचा शोध घेणेकामी गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने कोंढवा व बिबवेवाडी या परिसारात सदर आरोपी राहत असल्याची माहिती प्राप्त झाल्याने बिबवेवाडी के के मार्केट येथे या गुन्हयातील आरोपी नामे अमोल चंद्रकांत शहा हा येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे नियोजन सापळा रचून तो बिबवेवाडी के के मार्केट येथे आल्यानंतर त्यांच्याबाबत खात्री झाल्यावर त्यास शिताफीने ताब्यात घेऊन त्यांना आर्थिक गुन्हे विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयात आणून त्यांना दि. १६/०१/२०१७ रोजी २३.२० वा अटक केली. सदर गुन्हयात मुख्य आरोपी नामे राजेश दिनकर कांबळे व त्यांची पत्नी नामे सौ. विद्या राजेश कांबळे हे फरारी आहेत.

सदर कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे श्री. दिपक साकोरे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे श्री. संजय कुरुंदकर यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पो.नि. श्री. एम.एस.कुंभार, पोलीस उप-निरीक्षक श्री. मुलाणी, पो.हवा. विकास कोळी, पो.हवा. संतोष गणबोटे, पो. हवा. राजेश परंडवाल म.पो.शि. सपना म्याना यांनी केलेली आहे.

तसेच वरील नमुद गुन्हयामध्ये ज्या लोकांची फसवणुक झाली आहे त्यांनी आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर संगमब्रीज शिवाजीनगर येथे पोलीस निरीक्षक एम.एस.कुंभार मो. नं. ८१०८००५५३७ यांचेशी संपर्क साधावा.